# सेवायोजन जाहिरात क्र. ०६/२०२३

## प्रसिध्दीपत्रक

-------

१. महावितरण कंपनीमध्ये "विद्युत सहाय्यक" या संवर्गाची रिक्त पदे भरण्याकरीता जाहिरात क्र. ०६/२०२३ प्रसिध्द करण्यात आलेली होती. "विद्युत सहाय्यक" पदाची परिमंडळनिहाय प्रतिक्षा यादी दिनांक ३१/१०/२०२५ रोजी कंपनीच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे.

२. प्रतिक्षा यादीवर निवड झालेल्या उमेदवारांची कागदपत्रांची पडताळणी व नियुक्तीबाबत परिमंडळनिहाय उमेदवारांची यादी, उमेदवारांना सविस्तर सूचना कंपनीच्या संकेतस्थळावर (www.mahadiscom.in) दिनांक ३१/१०/२०२५ रोजी प्रसिध्द करण्यात येऊन कागदपत्रांची पडताळणी संबंधित परिमंडळामध्ये दिनांक ०६-०७ नोव्हेंबर, २०२५ रोजी करण्यात आली आहे.

३. तथापि, काही उमेदवार त्यांच्या अपरिहार्य कारणामुळे कागदपत्रे पडताळणीकरीता अनुपस्थित राहिल्याने उमेदवारांनी पुनश्च: कागदपत्रे पडताळणीकरीता संधी मिळणेबाबत विनंती केलेली आहे. **सबब, शेवटची संधी म्हणून प्रतिक्षा यादीतील गैरहजर उमेदवारांनी त्यांना वर्ग करण्यात आलेल्या परिमंडळ कार्यालयामध्ये दिनांक २६-२७ नोव्हेंबर, २०२५ रोजी सकाळी १०.०० वाजता मूळ कादपत्रांसह उपस्थित रहावे.**

४. उमेदवारांनी परिमंडळनिहाय यादी, कागदपत्रे तपासणीकरीता आणावयाची कागदपत्रांची यादी इ. विस्तृत माहितीकरीता कंपनीच्या संकेतस्थळाचे (www.mahadiscom.in) अवलोकन करावे. या प्रक्रियेनंतर गैरहजर उमेदवारांच्या कोणत्याही प्रकारच्या निवेदनाची दखल घेतली जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

Sd/-

**दिनांक : १९/११/२०२५** **कार्यकारी संचालक (मासं)**